

# मुकूल माधव फांऊडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील एनआयसीयु वॉर्डमध्ये विशेष कक्ष

■ पुणे :

**शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणाऱ्या मुकूल माधव फांऊडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील नवजात अतिदक्षता कक्ष (एनआयसीयु) सुरु करण्यात आला असून या कक्षाचे नामकरण सोनाली-द लिटल स्टार्स रुम असे करण्यात आले आहे.**

या कक्षाचे उद्घाटन स्पायका इलास्टीक प्रा.लिमिटेडचे संचालक रजनीकांत जैठा यांची पत्नी आशा जैठा यांच्या हस्ते झाले. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व मुकुल माधव फांऊडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे व मुकुल माधव फांऊडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फांऊडेशच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया, केईएम रुग्णालयाचे चिकित्सा निर्देशक डॉ. के.जे.कोयाजी, बालतज्ज्ञ विभागाचे निर्देशक डॉ.ए.एन.पंडित, स्पायका इलास्टीक प्रायव्हेट लिमिटेडचे मनिष व मनिषा जैठा व मुकुल माधव फांऊडेशनच्या विश्वस्त गायत्री छाब्रिया आदी उपस्थित होते.

सोनाली-द लिटल स्टार्स रुम म्हणजेच नवजात अर्भ्रक अतिदक्षता कक्षामध्ये ६ बेड असून एक व्हेंटिलेटर, बबल, सीपीएपी, पल्स ऑक्झिमीटर, फोटोथेरपी युनिट, सिरींज पंप व वॉर्मर यांचा समावेश आहे. ज्यांची आर्थिकस्थिती सामान्य आहे अशा नागरिकांसाठी ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मुकुल माधव फांऊडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया म्हणाले, केईएम रुग्णालय गरीब व गरजवंत लोकांसाठी कार्यरत असल्याचा विश्वास आहे. मुकुल माधव फांऊडेशन नेहमीच मुलांच्या विकासासाठी योगदान करत आले आहे.

केईएमच्या एनआयसीयुचे प्रभारी डॉ.उमेश वैद्य यांनी समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील व्यक्तींसाठी नवजात अर्भ्रकांसाठी विशेष दक्षता कक्षाची गरज असल्याची भावना व्यक्त केल्यानंतर सोनाली-द लिटल स्टार्स कक्ष अस्तित्वात आला. मुकुल माधव फांऊडेशनच्या विश्वस्तांचा उदारपणा लक्षात घेऊन डॉ.उमेश यांनी त्यांच्याशी संपर्क करुन २००२ साली केईएम रुग्णालयाच्या बालरुग्ण विभागाला काही उपकरणे देणगी स्वरुपात दिली होती.

सोनाली हे नाव प्रकाश छाब्रियां यांच्या लहानपणीच निधन झालेल्या बहीणीचे असून त्या नावावरुन हा कक्ष सुरु करण्यात आला आहे.